RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# परसबागकाम व रोपवाटिका विकसन : एक पर्यावरणीय व आरोग्यदायी उपक्रम

**वंदना. ए. लावंड**
सहायक प्राध्यापक
वेणूताई महिला शिक्षणशास्त्र
महाविदयालय, सातारा

**सारांश**

शिक्षण प्रक्रियेत विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कार्यानुभव विषयाचा समावेश अभ्यासक्रमात केला जातो. यामध्ये प्रत्यक्ष अनुभवाचा व कृतीचा समावेश असतो.

परसबागकाम व रोपवाटिका विकसन हा विषय वेणूताई महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय, सातारा येथे नाविन्यपूर्ण राबविला जातो. अभ्यासक्रमात याचे दोन विभाग केलेले आहेत.

सध्याच्या जीवनशैलीचा व फ्लॅट संस्कृतीचा विचार करता परसबाग व झाडे लावलेल्या कुंडया मनावरील ताण कमी करतात, ताजी सकस भाजी मिळवून देण्यास मदत करतात त्यातून अनारोग्य टाळता येते. झाडे वाढविण्याने आल्हादायक वातावरण निर्मिती करता येते व स्वःनिर्मितीचा आनंद मिळतो. असा हा विषय पर्यावरण व आरोग्य या दृष्टीकोन विकसित होण्यासाठी शिक्षण देणे गरजेचे आहे. व त्यासाठी प्रथम शिक्षक प्रशिक्षणार्थीना या विषयाचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे महत्वाचे ध्येय असते.म्हणून इतर विषयाबरोबर कार्यानुभव या विषयाचा समावेश अभ्यासक्रमात केला जातो. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी कार्यानुभव विषय आवश्यक ठरतो. या विषयातून प्रात्यक्षिक कामास संधी व प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

वेणूताई महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय, सातारा हे शाहू शिक्षण संस्थेचे व एस.एन.डी.टी. विदयापीठाशी संलग्न असणारे सातारा जिल्हयातील एकमेव महिला शिक्षक प्रशिक्षण महाविदयालय आहे. महाविदयालय एस.एन.डी.टी. विदयापीठाचा नेमून दिलेला अभ्यासक्रम काटेकोरपणे राबवित असते. तसेच नेमून दिलेल्या अभ्यासक्रमात नाविन्यता आणून नवोपक्रम राबवून अभ्यासक्रम पूर्ण करीत असते. एस.एन. डी.टी. विदयापीठाच्या अभ्यासक्रमात कार्यानुभवः परसबागकाम आणि रोपवाटिका विकसन हा विषय अंतर्भूत केलेला आहे. महाविदयालय दरवर्षी नाविन्यपूर्णतेने हा विषय राबवत असते.

**कार्यानुभव : परस बागकाम आणि रोपवाटिका विकसन अभ्यासक्रम**

उदिष्टे :विदयार्थी शिक्षकास पुढील बाबींसाठी आणि महत्व जाणणे.

- रोपवाटिका विकसनाची संकल्पना आणि महत्व जाणणे.
- रोपवाटिकेच्या विकसनासाठी आवष्यक असलेल्या गरजांचा परिचय होणे.
- रोपवाटिकेच्या माध्यमातून व्यावसायिक दृष्टीने स्वावलंबी होणे.
- सौंदर्यदृष्टी विकसित करणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**घटक : अ) रोपवाटिका विकसन : संकल्पना आणि महत्व.**

**ब) रोपवाटिका विकसनाच्या गरजा**

- जमीन (भूमी), माती, साधने (हत्यारे), इतर साहित्य

**क) नियोजन (हंगामी कार्य, अंदाजपत्रक)**

- फुलझाडांचे संगोपन, फुलझाडे वाढविण्याचे प्रकार व तंत्रे उदा. निशीगंध, गुलाब, ग्लाडिओलस, लिली, जुई, मोगरा, कुंदा, झेंडू, जल व्यवस्थापन, कापणी, कीटकनाशकांचा वापर, फुलझाडांची निगा/देखभाल, तण नियंत्रण.

**ड) मातीच्या कुंडया व प्लास्टिक पिशव्यांमध्ये नमुना रोपे तयार करणे**

- बी, शाखीय, कलम, वनीकरणासाठी मातीच्या कुंडया व प्लास्टिक पिशव्या तयार करणे, रोपांना पाणी देणे, खते, पोषक द्रव्ये, कीटकनाशके यांचा वापर.

**इ) रोपांचे संवर्धन**

- शोभेच्या रोपांची निवड, मांडणी आणि काळजी.
- घरातील व बागेतील रोपे.
- झुलत्या कुंडया तयार करणे.
- हरितगृह तयार करणे त्याचे महत्व व व्यवस्थापन.
- पुष्परचनेचा अभ्यास.

**प्रात्यक्षिक**

1) प्लास्टिक पिशव्यांमध्ये रोपे वाढविणे.
2) झुलत्या कुंडया तयार करणे.
3) परसबाग विकसित करणे (दोन पालेभाज्या व दोन फळभाज्या वाढविणे)
4) रोपवाटिका किंवा परसबागेला भेट देवून अहवाल लिहिणे.

**महाविदयालयात उपकमाची कार्यवाही**

वेणूताई महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय, सातारा येथे कार्यानुभवातंर्गत रोपवाटिका विकसन संकल्पना आत्मसात करुन व्यावसायिक दृष्टीने स्वावलंबी होणे, सौदर्यदृष्टी विकसित करणे या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाची दोन भागात विभागणी करण्यात येते.

**विभाग :** 1) रोपवाटिका विकसन संकल्पना तात्विक माहिती.

**विभाग :** 2) प्रात्यक्षिक कार्य.

**विभाग : 1) रोपवटिका विकसन संकल्पना तात्विक माहिती.**

महाविदयालय सुरु झाल्यानंतर सर्व अभ्यासक्रमाची ओळख करुन देताना या विषयाची थोडक्यात माहिती सांगितली जाते.

महाविदयालयात तात्विक माहितीसाठी तंज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

- श्री. संभाजीराव यादव, संचालक भलरी रोपवाटिका, आतित
- श्री. अरुण सुर्यवंशी, सकाळ भाजीपाला समिती, सातारा

रोपवाटिका अर्थ, गरज, महत्व, रोपांची हंगामानुसार निवड करणे, वनस्पतींची काळजी घेण्याची पध्दत कलमांचे प्रकार, वनस्पतींचे आरोग्य इ. माहिती दिली जाते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**विभाग : 2 प्रात्यक्षिक कार्य**

यामध्ये विदयार्थीनींचे गट केले जातात. प्रत्यक्ष गादीवाफा कसा तयार करावा, कुंडी कशी भरावी, टाकाऊ वस्तूंपासून आपली परसबाग आसपासची जागा, टेरेस या ठिकाणी रोपे लावणे, याविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाते. टाकाऊ वस्तू उदा. कचरा, कागद, भाजीची देठे इ. पासून खतनिर्मिती कशी करावाची याचे मार्गदर्शन केले जाते.

झुलत्या कुंडया (Hanging Pots) तयार करुन फ्लॅट संस्कृतीत वनस्पती वाढविण्याचा आनंद मिळविण्यासाठी रोपांची निवड कशी करावी. घराच्या कोणत्या दिशेला आवश्यक तेवढाच सुर्यप्रकाश मिळण्याच्या दृष्टिकोनातून कुंडया कोणत्या दिशेला त्या ठेंवाव्यात याचे मार्गदर्शन केले जाते.

प्रत्यक्ष रोपवाटिकेला भेट देवून विविध रोपांविषयी माहिती देण्यात येते. नक्षत्र वन अशा संकल्पनांविषयी माहिती दिली जाते.

ज्या विदयार्थिनींच्या घरी घराच्या भोवती जागा आहे अशा विदयार्थिनींना परसात बागकाम करण्याचे मार्गदर्शन केले जाते.

**उपक्रमाचे महत्व/उपयुक्तता**

1) वर्तमान काळातील लोकांची जीवनशैली खूप तणाव निर्माण करणारी आहे. तणाव मुक्त होण्यासाठी झाडांच्या सानिध्याची मदत घेता येते. झाडाला पाणी घालणे, त्याला हळुवार स्पर्श करणे, झाडाची काळजी घेणे, झाडाची वाढ व विकास होताना निरीक्षण करणे. यातून ताण कमी होत असतो.
2) शहरी फ्लॅट संस्कृतीमुळे झाडे लावण्यास जागा मिळत नाही. मग आहे त्याच घरात फ्लॅटमध्ये बाल्कनीत/गॅलरीत कुंडयामध्ये झाडे लावून त्यांची जोपासना करुन स्वतःची कुंडीतील बाग विकसित करता येते. व आपोआपच पर्यावरण संतुलनासाठी हातभार लावता येतो.
3) घराभोवती थोडीफार जागा असेल तर तेथे परसात विविध प्रकारचा भालीपाला स्वतः लावून वाढविता येतो. काही घरगुती औषधी वनस्पती उदा. पुदीना, आले, गवती चहा, अडुळसा, कोरफड लावता येतात. स्वतः केलेल्या लागवडीतून, जोपासनेतून कार्याचा आनंद मिळतो.
4) परसबागेतील व कुंडयांमधील झाडांसाठी रासायनिक खताचा वापर केला जात नाही किटकनाशके फवारली जात नाहीत. घरगुती उपाय योजना केल्या जातात. त्यामुळे भाजी फळे यातून आरोग्यास धोका निर्माण करणारी रसायने, किटकनाशके यांचा प्रतिबंध होतो. भाजीपाल्यापासून आरोग्यास कोणत्याही प्रकारचा अपाय होत नाही.
5) घरातील ओला कचरा वाळका कचरा यांपासून खत निर्मिती करता येते. त्यातून घरातील कच–याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावता येते. नगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापनावरील ताण कमी होण्यास हातभार लागतो.
6) घरातील सांडपाणी झाडांसाठी वापरता येते. त्यामुळे पाण्याचा पुर्नवापर होतो व पाणी व्यवस्थापन करता येते.
7) झाडांच्या पालापाचोळयापासून सेंद्रिय खत निर्मिती करता येते.
8) घरामध्ये तसेच घराभोवती आल्हादायक वातावरणाची निर्मिती होते. निसर्गाच्या सानिध्याचा आनंद लुटता येतो.
9) परसबागेत फळझाडे असल्यामुळे विविध पक्षी, प्राणी येतात. जैवविविधता जोपासण्यास मदत मिळते.
10) फावल्या वेळेतून स्वतः निर्मितीचा आनंद अनुभवता येतो.
11) व्यावसायिक दृष्टिकोनातून रोपवाटिका विकसित करता येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## शिक्षक प्रशिक्षणासाठी शिफारशी

- शिक्षक प्रशिक्षणामध्ये या विषयाचा आवश्यक विषय म्हणून समाविष्ट केला तर प्रशिक्षणार्थीमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित होईल.
- शिक्षक प्रशिक्षणार्थी हा भावी शिक्षक असतो. विदयार्थ्यांचा आदर्श बनणार असतो. पर्यावरणाविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन विदयार्थ्यांमध्ये संक्रमित होण्यास मदत होईल.
- शिक्षक प्रशिक्षणातील तात्विक व प्रात्यक्षिक अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीवर आलेला ताण नैसर्गिकरित्या कमी करण्यासाठी महाविदयालयाने बाग विकसित करावी.

## संदर्भ सूची


- डॉ. भांडारकर के. म. (2006), पर्यावरण शिक्षण, पुणे : नित्य नुतन प्रकाशन.
- कुलकर्णी दिलीप (2012), पर्यावरण घरोघरी, कुडावळे (रत्नागिरी): संतुलन प्रकाशन.
- बी. एड – माहिती पुस्तिका व अभ्यासक्रम – वेणूताई महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय, सातारा.
- प्रियदर्शिनी – वार्षिक नियतकालिके, वेणूताई महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय, सातारा.